# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## Zilla Parishad, Satara

# योग प्रशिक्षक भरती

जिल्हा परिषद सातारा यांचे मार्फत सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व ०४ आयुष आरोग्य वर्धिनी केंद्र येथे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपात योग प्रशिक्षक नेमावयाचे आहेत.

संपूर्ण जिल्हात एकूण ७६ योग प्रशिक्षकांची पदे ३१ मार्च २०२४ पर्यंत मंजुर आहेत.

योग प्रशिक्षकांना प्रति योग सत्राकरिता (प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र) रु.५००/- मानधन व आयुष आरोग्य वर्धिनी केंद्र रु.२५०/- प्रती योग सत्राकरिता अदा केले जाणार आहे.

योग प्रशिक्षकाकरिता अर्ज करण्याची अंतिम दिनांक :- ३०-११-२०२३

अर्जाचा नमुना प्राप्त करुन घेणेसाठी व जाहिरातीसंबंधी सविस्तर माहिती जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेत स्थळावर वर उपलब्ध आहे.

अर्ज करणेसाठी रक्कम रु.५००/- चा डिडि/ऑनलाईन/प्रत्यक्ष बँकेत भरलेले चलन District Integrated Health & Family Welfare Society, Satara शाखा Bank of Maharashtra, Shivaji Circle, Powai Naka, Satara यांच्या नावे असणे बंधनकारक आहे.

| | |
|---|---|
| Sign<br>District Health Manager,<br>Zilla Parishad, Satara | Sign<br>Chief Executive Officer,<br>Zilla Parishad, Satara |

# योग प्रशिक्षकासाठी सुचना

१. योग प्रशिक्षक म्हणून निवड करताना प्रकल्प कृती आराखडा सन २०२३-२४ च्या अन्वये ३१ मार्च २०२४ पर्यंत कंत्राटी नियुक्ती आदेश पात्र उमेदवारांना देण्यात येतील.

२. उमेदवारांनी भरतीचा अर्ज स्वत: जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घ्यावयाचा आहे व जिल्हा कार्यालयास आपला अर्ज (योग सबंधी कागदपत्रांसह) व भरती प्रक्रिया शुल्काची पावती सादर करावयाची आहे.

३. अर्ज छाननी प्रक्रिया राबविणेत येऊन तात्पुरती/प्राथमिक पात्र/अपात्र यादी तयार करण्यात येईल त्याबरोबरच वेळोवेळी सुचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील. पात्र/अपात्र यादीतील उमेदवारांची यादी जिल्हा परिषद सातारा यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेनंतर अपात्र ठरलेल्या उमेदवारांनी "शेरा" या रकाण्यातील दर्शवलेल्या त्रुटीनुसार आपली हरकत असल्यास विहित वेळेत या कार्यालयास आपल्या हरकत अर्जासह व आवश्यक असणाऱ्या मुळ कागदपत्रांसोबत सादर करावे.

४. सुचनांमध्ये नमुद केलेल्या विहीत मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही उमेदवाराची हरकत/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही/तसेच कोणत्याही पदाधिकारी यांचे मार्फत त्याबाबतची शिफारस करु नये.

५. अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द केलेनंतर फक्त अंतिम यादीतील पात्र उमेदवारांनाच मुळ कागदपत्र पडताळणी, मुलाखत व प्रात्यक्षिक व समुपदेशनासाठी बोलविणेत येईल.

६. उमेदवारांनी जिल्हा परिषद सातारा आरोग्य विभागामार्फत प्रसिध्द होणाऱ्या निवेदन/सुचना या जिल्हा परिषद सातारा यांचे www.zpsatara.gov.in या संकेत स्थळावर वेळोवेळी अवलोकन करावे व इतर कोणत्याही बाबतीत जिल्हा कार्यालयास दुरध्वनीद्वारे/वारंवार भेटुन संपर्क साधु नये.

७. भरती प्रकियेतील पुढील टप्पे खालील प्रमाणे-

- **योग प्रशिक्षकांनी मुलाखत / प्रात्याक्षिक दरम्यान भरलेला फॉर्मची एक प्रत व योगप्रशिक्षणासंबंधी मुळ कागदपत्रे** (Degree, Diploma, Certificate Course, Govt. Experience Certificate) **प्रत्यक्ष सादर करावयाची आहे. मुळ कागदपत्रे सादर न केल्यास भरती प्रक्रियेतुन आपणास कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यात येईल.**
- भरती प्रक्रियेमध्ये पुढील प्रमाणे गुणानुक्रमे (Merit) ठरविले जाईल.

(Degree ⟶ Diploma → Certificate Course + Govt.Experience Certificate) या प्रमाणे ठरविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | योग पदवी असल्यास | १० गुण |
| ब | योग डिप्लोमा असल्यास | ६ गुण |
| क | सर्टिफिकेट कोर्स असल्यास | ४ गुण |
| ड | शासकीय संस्थेतील प्रत्येक ६ महिन्यांसाठी १ गुण असे अधिकतम १०गुण | १०गुण |
| | **एकूण गुण** | **३० गुण** |

- एकुण ३० गुणांपैकी प्राप्त होणाऱ्या एकुण गुणांनुसार मेरीट ठरविले जाईल.
- **भरती प्रक्रियेत अंशत: बदल करणे/धोरणात्मक निर्णय घेणे/रद्द करणे याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.**
- जाहिरातीनुसार रिक्त असलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रावर व अंतिम यादीनुसार उमेदवारांना मेरिटप्रमाणे समुपदेशना करिता बोलविले जाईल. समुपदेशनामध्ये गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना रिक्त असणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देणेत येतील. जे उमेदवार नियुक्तीसाठी इच्छुक नसतील त्यांचा नकार गृहीत धरुन तात्काळ त्याच दिवशी नकारपत्र भरुन देणे अनिवार्य राहील. त्यामुळे उमेदवारांने विचारांती निर्णय घ्यावा.

- समुपदेशनपश्चात देणेत आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रानुसार कंत्राटी नियुक्ती आदेश ई मेल /वेबसाईटवर देणेत येतील.
- मेरीट यादीत एखाद्या उमेदवाराचे समगुण झाल्यास खालीलप्रमाणे मेरीट प्राध्यान्यक्रमाचे निकष राहतील. तदनंतरच अंतिम यादी प्रसिध्द करणेत येईल.
    १) योगसंबंधी पदवीच्या (Degree in Yoga) अंतिम वर्षाचे गुण
    २) योगसंबंधी पदवीका (Diploma in Yoga) अंतिम वर्षाचे गुण
    ३) जन्मतारीख (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य)
- कंत्राटी नियुक्ती आदेशात कोणत्याही प्रकारे नियुक्तीचे ठिकाण बदलुन दिले जाणार नाही. त्यामुळे समुपदेशनाने नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती ठिकाण बदलणेसाठी या कार्यालयास पत्र व्यवहार /विनंती अर्ज /पदाधिकारी यांचेमार्फत शिफारस करु नये.
- नियुक्ती आदेशापश्चात ०७ दिवसाच्या आत दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणेचे आहे व तसा हजर अहवाल तालुका कार्यालयामार्फत जिल्हा कार्यालयास ई मेलव्दारे पाठविणेचा आहे.
- आपण नियुक्ती आदेशानुसार दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत हजर न झाल्यास आपण सदर पदावर काम करण्यास इच्छुक नसून आपली जिल्हा कार्यालयाकडे या बाबतची कोणतीही भविष्यात तक्रार असणार नाही व नियमाप्रमाणे प्रतिक्षायादी मधील असणाऱ्या उमेदवारांना पुढील नियुक्ती आदेश दिले जातील.
- योग प्रशिक्षकाला प्रत्येक आठवड्यात कार्यरत आरोग्यवर्धीनी केंद्रामध्ये (प्रा.आ.केंद्र, उपकेंद्र, व नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये) **एक शिबीर किमान २० लाभार्थ्यांच्या उपस्थितीत** आयोजित करावयाचे आहे.
- एकाच दिवशी ०२ पेक्षा जास्त शिबीरे आरोग्यवर्धीनी केंद्रावर (प्रा.आ.केंद्र, उपकेंद्र) आयोजित करता येणार नाही, तसे केल्यास अतिरिक्त शिबीराचे मानधन अदा केले जाणार नाही.
- प्रत्येक शिबिरामागे प्रत्येक योग शिक्षकाला रु.५००/- मानधन प्रा.आ.केंद्र स्तरावरुन शिबिरांच्या संख्येनुसार दिले जाणार आहे. तसेच आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रासाठी नियुक्ती आदेशात नमुद केलेप्रमाणे मानधन राहील.
- ज्या योगशिक्षकांचे वार्षिक मानधन रु.३००००/- पेक्षा जास्त होणार आहे अशा सर्व योगशिक्षकांचे राज्य कार्यालयाच्या पत्रानुसार कलम **Tax Compliance Calender मधील Section 194-J अंतर्गत आपल्या सेवा येत असल्याने 10 % TDS कपात करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात या कार्यालयाकडे TDS कपातीविषयी कोणतीही विचारणा करण्यात येऊ नये.**
- भरती शुल्क खालील खात्यावर डिडि/ऑनलाईन/प्रत्यक्ष बँकेत चलनाद्वारे भरावयाचे असुन भरती शुल्क रु.५००/- याप्रमाणे असेल.

District Integrated Health & Family Welfare Society, Satara
शाखा Bank of Maharashtra, Shivaji Circle, Powai Naka, Satara
बँक खाते क्रमांकः- 60402928399
आयएफएससी कोडः- MAHB0000305

| | | |
|---|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>जिल्हा परिषद सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा |

अर्जाचा नमुना

योग प्रशिक्षक पदासाठी अर्ज

Photo

**प्रति,**

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद सातारा.

**संपुर्ण नाव** **मराठीमध्ये** English (Capital Letter)

१)आडनाव ........................................................ ...............................................................

२)स्वत:चे नाव ........................................................ ...............................................................

३)वडीलांचे / पतीचे नाव ........................................................ ...............................................................

४)आईचे नाव ........................................................ ...............................................................

**पत्रव्यवहारचा संपुर्ण पत्ता पिनकोडसहीत**

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

**दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक** ...................................................... मेल आयडी ........................................................

**जन्मतारीख :-** / / दि.११-११-२०२३ रोजीचे वय :-................वर्षे ............... दिवस

५) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२ वी | | | | |
| २ | पदवी | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

६) अनुभव (केवळ शासकीय व निमशासकीय)

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे |
|---|---|---|---|
| | पासुन | पर्यत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

७) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय?

| होय | नाही |
|---|---|
| | |

असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

..................................................................................................................................................

८) खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१. ........................................................................................................................

२. ........................................................................................................................

३. ........................................................................................................................

४. ........................................................................................................................

५. ........................................................................................................................

९) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे? काय होय/नाही

मी असे प्रमाणित करतो/ करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे. जाहिरातीनुसार या पदाकरीता बिंदुनामावलीची अट नाही, वयाची अट नाही तसेच या पदाकरीता भविष्यात जे जे नियम लागु होतील त्याचे पालन मी करेन. ३१ मार्च २०२४ पर्यत कंत्राटी नियुक्ती आदेश मिळाल्यास माझी हरकत नसुन कोणत्याही प्रकारे मी सरळसेवामध्ये समाविष्ट करण्यासाठी आग्रही राहणार नाही याची हमी देतो/ देते.

१०) कंत्राटी नियुक्तीसाठी प्राधान्यक्रम:- **तालुका व प्रा.आ.केंद्र नाव**

| अ.क्र. | **तालुका नाव** | **प्रा.आ.केंद्र नाव** |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

सही /-

नाव .....................................................